


सायं दैनिक
# नांदेड वार्ता
www.nandedwarta.com

• वर्ष २५ वे • अंक ५ • मंगळवार दि.२२ सप्टेंबर २०२६ • नांदेड • पोस्ट परवाना/एनएनडी/आरएनपी-२६२/२०२६-२०२८ • पाने ४ • किंमत १ रु.

# दुष्काळग्रस्तांच्या नुकसानीचे उद्यापासून पंचनामे;मदतीसाठी मंत्रिमंडळ उपसमिती गठीत



## राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत पाच महत्वाचे निर्णय

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांसाठी मंत्रिमंडळ उपसमिती स्थापन करण्यास राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत आज मंजुरी देण्यात आली. उद्यापासून दुष्काळग्रस्त भागातील पिक नुकसानीचे पंचनामे सुरु करण्यात येणार आहेत. येत्या शनिवारपर्यंत यासंदर्भातील प्राथमिक अधिसूचना काढण्यात येणार असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंत्रिमंडळ बैठकीनंतर पत्रकारांशी बोलतांना दिली. आज झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत दुष्काळासह राज्यातील पाच महत्वाच्या निर्णयांना मंजुरी देण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

राज्य मंत्रिमंडळाची बैठक आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली घेण्यात आली. या बैठकीत राज्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीसह पाच महत्वाचे निर्णय घेण्यात आले. पावसाने मारलेली दडी आणि त्यामुळे अडचणीत आलेल्या शेतकऱ्यांच्या प्रश्नावर महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. राज्यातील अनेक भागांत पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने खरीप हंगामातील पिकांवर परिणाम झाला आहे. त्यामुळे शेतकरी आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष आजच्या मंत्रिमंडळ बैठकीकडे लागले होते. या पार्श्वभूमीवर दुष्काळ निवारणाच्या उपाययोजनांना गती देण्यासाठी उपसमिती स्थापन करण्याचा निर्णय घेण्यात आला. दुष्काळी परिस्थितीची प्रत्यक्ष पाहणी करण्यासाठी मंत्री बांधावर जाऊन शेतकऱ्यांशी संवाद साधणार असून, मदत शेतकऱ्यांपर्यंत पोहोचविण्याच्या प्रक्रियेला गती देण्याचेही ठरविण्यात आले आहे.आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत दुष्काळ निवारणासह एकूण पाच महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले.

**शेतकऱ्यांना विकसित भूखंड**

मुंबई मेट्रो मार्गिका ४, ४ अ आणि १० प्रकल्पाच्या एकात्मिक कारशेड डेपोसाठी जमीन दिलेल्या मौजे मोघरपाडा येथील प्रकल्पबाधित शेतकऱ्यांना मालकी हक्काने विकसित भूखंड वाटप करण्यास मंजुरी देण्यात आली.

**म्हाडा इमारतींचा समूह पुनर्विकास**

मुंबईतील खार (पश्चिम) येथील रामकृष्णनगरमधील म्हाडाच्या जुन्या व मोडकळीस आलेल्या इमारतींचा एकत्रित पुनर्विकास करण्यास मंजुरी देण्यात आली.

**कृषी विभागाचा सुधारित आकृतीबंध रद्द**

कृषी विभागाचा सुधारित आकृतीबंध रद्द करून सन २००९ मध्ये मंजूर झालेला आकृतीबंध तात्पुरता कायम ठेवण्याचा निर्णय घेण्यात आला. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर मंत्रिमंडळ उपसमितीला दिलेले अधिकार आणि शनिवारपर्यंत काढण्यात येणारी प्राथमिक अधिसूचना यामुळे आगामी काळात शेतकऱ्यांसाठी कोणत्या स्वरूपाच्या मदत व उपाययोजना जाहीर होतात, याकडे राज्यातील शेतकरी आणि लोकप्रतिनिधींचे लक्ष लागले आहे..

# मराठवाडा पदवीधरसह विधानपरिषदेच्या पाच जागांसाठी निवडणूक

## २३ ऑक्टोबरला मतदान,२७ ला मतमोजणी

मुंबई/प्रतिनिधी-केंद्रीय निवडणूक आयोगाने महाराष्ट्रातील विधानपरिषदेच्या पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघातील पाच जागांसाठी निवडणुकीचा कार्यक्रम आज दि.२२ सप्टेंबर रोजी जाहीर केला. त्यानुसार अमरावती, पुणे, नागपूर आणि औरंगाबाद (छत्रपती संभाजीनगर) विभागातील पाच जागांसाठी २३ ऑक्टोबर २०२६ रोजी मतदान होणार असून २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी होणार आहे. या घोषणेमुळे राजकीय पक्षांमधील हालचालींना वेग येण्याची शक्यता आहे.

राज्यात पुन्हा एकदा विधानपरिषद निवडणुकीचे पडघम वाजणार आहेत. या निवडणुकीत पदवीधर मतदारसंघाच्या तीन, तर शिक्षक मतदारसंघाच्या दोन जागांचा समावेश आहे. विद्यमान सदस्यांचा कार्यकाळ ६ डिसेंबर २०२६ रोजी संपत असल्याने या जागांसाठी निवडणूक घेण्यात येत आहे. निवडणूक आयोगाच्या यादीत छत्रपती संभाजीनगर विभाग पदवीधर मतदारसंघातून सतीश भानुदासराव चव्हाण, पुणे विभाग पदवीधरमधून अरुण गणपती लाड, नागपूर विभाग पदवीधरमधून अभिजीत गोविंदराव वंजारी, अमरावती विभाग शिक्षक मतदारसंघातून किरण रामराव सरनाईक आणि पुणे विभाग शिक्षक मतदारसंघातून जयंत दिनकर आसगावकर यांची नावे आहेत. आयोगाच्या कार्यक्रमानुसार २९ सप्टेंबर २०२६ रोजी निवडणुकीची अधिसूचना प्रसिद्ध होणार आहे. त्याच दिवसापासून उमेदवारी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू होईल. अर्ज दाखल करण्याची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर आहे.७ ऑक्टोबर रोजी अर्जांची छाननी केली जाईल, तर ९ ऑक्टोबर ही उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख आहे. त्यानंतर २३ ऑक्टोबर रोजी सकाळी ८ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. २७ ऑक्टोबर रोजी मतमोजणी केली जाणार आहे. विधानपरिषदेच्या या पाच जागांसाठी निवडणूक जाहीर झाल्याने आता राजकीय पक्षांकडून उमेदवारांची चाचपणी सुरू होण्याची शक्यता आहे. विशेषतः पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघांमध्ये पक्षीय समीकरणांसोबतच स्थानिक संघटनांची ताकद, मतदारसंघातील प्रश्न आणि उमेदवारांच्या संपर्काचा मुद्दा महत्त्वाचा ठरणार आहे. छत्रपती संभाजीनगर पान ४ वर

# आदिवासी निधी घोटाळ्यातील दोषींवर कडक कारवाई करा

## नॅशनल गोंडवाना युथ फोर्सची मुख्यमंत्र्यांकडे मागणी



किनवट/प्रतिनिधी- एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयातील आदिवासी विकासासाठी आलेल्या १६ कोटी ३७ लाख रुपयांच्या निधीतील कथित गैरव्यवहाराची उच्चस्तरीय चौकशी करून दोषींवर कारवाई करावी, अशी मागणी नॅशनल गोंडवाना युथ फोर्सने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालयात आदिवासींच्या विकासासाठी आलेला कोट्यावधीच्या निधीत प्रकल्प अधिकाऱ्यांच्या नाकावर टिच्चून वरिष्ठ लिपिक भगवान डवरे महाघोटाळा घडविला आहे. या कार्यालयात ठाण मांडून बसलेल्यांच्या तात्काळ बदल्या कराव्यात. मागील दहा वर्षांपासून केलेल्या लेखापरीक्षणाचे पुर्नलेखापरीक्षण करण्याची नितांत आवश्यकता आहे.वनहक्क आराखड्यातून मर्जीतील संस्थांकडे निधी वर्ग केला जातो. या महाघोटाळ्याची उच्चस्तरीय चौकशी करून दखलपात्र कारवाई करावी. गैरव्यवहारातील रक्कम व्याजासह वसूल करण्यात यावी, अशी मागणी 'नॅशनल गोंडवाना युथ फोर्स'च्या वतीने राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. संघटनेच्या निवेदनानुसार, १ एप्रिल २०२४ ते १६ सप्टेंबर २०२६ या कालावधीत शासकीय निधी, धनादेश नोंदवही आणि बँक खात्यांच्या व्यवहारात अनियमितता झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. सुमारे २५० धनादेशांच्या माध्यमातून निधीचा गैरवापर झाल्याचा दावाही निवेदनात करण्यात आला आहे. सामूहिक वनहक्क आराखड्याच्या कामात अधिकृत कार्यपद्धतीचा अवलंब न करता मर्जीतील संस्थांना निधी वितरित केल्याचा आरोप संघटनेने केला आहे. तसेच, अनेक वर्षांपासून एकाच कार्यालयात कार्यरत असलेल्या कर्मचाऱ्यांच्या तत्काळ प्रकल्पाबाहेर बदल्या कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे. मागील दहा वर्षांतील सर्व पान ४ वर




नांदेड तालुक्यातील ग्रामपंचायतींच्या सरपंच पदाच्या आरक्षणाची सोडत आज नांदेड तहसील कार्यालयात शालेय विद्यार्थ्यांच्या हाताने ईश्वर चिठ्ठी द्वारे जाहीर करण्यात आली.

# दुष्काळग्रस्तांसाठी कुंभमेळ्याचा निधी वळवा:संजय राऊत

मुंबई/प्रतिनिधी-राज्यातील अनेक तालुक्यांत कमी पावसामुळे दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर राज्य सरकारने कुंभमेळ्याचा कोट्यावधीचा निधी दुष्काळग्रस्तांसाठी वापरावा अशी मागणी शिवसेना नेते खा.संजय राऊत यांनी केली आहे.



राज्यातील अनेक तालुक्यांत पावसाने मोठी ओढ दिल्याने दुष्काळाची परिस्थिती निर्माण झाली आहे. काही भागांत ४० दिवसांपासून पाऊस नसल्याचे प्रशासनाच्या आढाव्यात समोर आले आहे. या पार्श्वभूमीवर शिवसेना ठाकरे गटाचे खासदार संजय राऊत यांनी राज्य सरकारवर टीका करत दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी तातडीने मदत जाहीर करण्याची पान ४ वर

# संभाव्य दुष्काळी परिस्थितीवर मात करण्यासाठी जलसंधारणाची कामे हाती घ्यावीत-जिल्हाधिकारी राहुल कर्डिले

## जिल्ह्यात १ लाख जलतारा करण्याचा संकल्प;३५ हजार ७७५ प्रस्ताव प्राप्त,२८ हजार ४०१ कामांना प्रशासकीय मान्यता



नांदेड/प्रतिनिधी-नांदेड जिल्ह्यात चालू पावसाळी हंगामात अपेक्षित सरासरीच्या तुलनेत पर्जन्यमानात घट झाली आहे. त्यामुळे आगामी काळात संभाव्य पाणीटंचाई व दुष्काळसदृश परिस्थिती निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता उपलब्ध पावसाच्या पाण्याचे जास्तीत जास्त संवर्धन करून भूजल पातळी वाढविण्यासाठी प्रभावी जलसंधारणाची कामे हाती घेणे आवश्यक आहे. या पार्श्वभूमीवर सेवा संकल्प अभियानांतर्गत रोजगार हमी व विकसित भारत रोजगार व आजीविका हमी ग्रामीण योजनेच्या माध्यमातून जलतारा, सिमेंट नाला बांध, विहिरींचे पुनर्भरण तसेच बोअरवेल/बोअर पुनर्भरणाची कामे मोठ्या प्रमाणात हाती घेण्यात येत आहेत.

ग्रामीण भागातील कुटुंबांना रोजगार उपलब्ध करून देतानाच टिकाऊ व उत्पादक मालमत्ता निर्माण करणे, हा रोजगार हमी योजनेचा प्रमुख उद्देश आहे. जमीन, पाणी व वृक्षांच्या विकासातून शेती व शेतीशी संबंधित उत्पादक मालमत्ता निर्माण करण्यावर या योजनेत विशेष भर देण्यात आला आहे. या माध्यमातून गावातील नागरिकांना स्थानिक पातळीवर रोजगार उपलब्ध होण्यासोबतच पावसाचे पाणी वाहून जाण्याऐवजी ते अडवून जमिनीत मुरविण्यास मदत होणार आहे.शेतकरी, ग्रामस्थ व नागरिकांनी आपल्या गावातील तसेच शेतजमिनीवरील आवश्यक जलसंधारणाच्या कामांचे प्रस्ताव संबंधित ग्रामपंचायतीकडे सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे. यामध्ये जलतारा, सिमेंट नाला बांध, विहीर पुनर्भरण आणि बोअरवेल/बोअर पुनर्भरण या कामांना प्राधान्य देता येणार आहे.ज्या शेतकरी व नागरिकांना त्यांच्या शेतजमिनीवर किंवा परिसरात ही कामे घ्यावयाची आहेत, त्यांनी संबंधित ग्रामपंचायत कार्यालय, ग्रामसेवक, ग्राम रोजगार सेवक किंवा पंचायत समिती कार्यालयाशी संपर्क साधून कामाची मागणी नोंदवावी. प्राप्त मागणी व प्रस्तावांची प्रचलित नियमांनुसार तपासणी करून पात्र व अनुज्ञेय कामांचे नियोजन करण्यात येणार आहे. ग्रामपंचायतींनी देखील आपल्या कार्यक्षेत्रातील जलस्रोत, नाले, पाणलोट क्षेत्र, विहिरी व बोअरची सद्यस्थिती लक्षात घेऊन आवश्यक कामांचे प्राधान्यक्रम निश्चित करावेत. तसेच ग्रामसभेत या कामांचा एकत्रित आराखडा तयार करून मान्यतेनंतर पुढील कार्यवाहीसाठी सादर करावा, असे आवाहन करण्यात आले आहे. शेतातील पाणी एकवटणाऱ्या उताराच्या ठिकाणी अथवा जमीन चिभडणाऱ्या ठिकाणी साधारण ५ फूट रुंद, ५ फूट लांब व ६ फूट खोल खड्डा तयार करून त्यामध्ये मोठे व मध्यम आकाराचे दगड भरून जलतारा तयार केला जातो. एका जलताऱ्यातून सुमारे ३.६० लाख लिटर पाणी जमिनीत मुरविण्याची क्षमता असल्याने विहीर व बोअरवेलमधील पाणीसाठा वाढण्यास मदत होते.जलताऱ्यांसह विहीर व बोअर पुनर्भरणाच्या कामांमुळे पावसाचे पाणी स्थानिक पातळीवर अडवून जमिनीत मुरविणे, भूजल पातळी वाढविणे आणि शेतीसाठी पाण्याची उपलब्धता टिकविणे शक्य होणार आहे. रोजगार हमीच्या माध्यमातून ही कामे केल्याने ग्रामीण भागातील नागरिकांना स्थानिक पातळीवर रोजगारही उपलब्ध होणार आहे.नांदेड जिल्ह्यात १ लाख जलतारा करण्याचा संकल्प जिल्हा प्रशासनाने केला आहे. त्यादृष्टीने कामाला गती देण्यात आली असून आतापर्यंत जिल्ह्यात ३५ हजार ७७५ जलतारांचे प्रस्ताव प्राप्त झाले आहेत. त्यापैकी ३१ हजार ३६० कामांना तांत्रिक मान्यता, तर २८ हजार ४०१ कामांना प्रशासकीय मान्यता देण्यात आली आहे. यापैकी २ हजार १ जलताऱ्यांची कामे प्रत्यक्ष सुरू झाली आहेत.जलसंधारणाच्या या कामांमुळे संभाव्य पाणीटंचाई व पान ४ वर

# शेतीचा कणा मोडतोय,सरकार कुठे आहे?




**सरफराज दोसानी**

माहूर:उत्तम शेती, मध्यम व्यापार आणि कनिष्ठ नोकरी ही म्हण आता इतिहासजमा होण्याच्या मार्गावर आहे. कधीकाळी अभिमानाने शेती करणारा शेतकरी आज शेतीच्या खर्चाचा आणि कर्जाच्या हप्त्यांचा हिशेब करत जगतो आहे. शेती हा व्यवसाय राहिला आहे की निसर्ग, बाजार आणि सरकारी यंत्रणेच्या तडाख्यात सापडलेले जोखमीचे जुगाराचे मैदान, असा प्रश्न निर्माण झाला आहे. शेतकऱ्याला अन्नदाता म्हणायचे आणि त्याच अन्नदात्याच्या संसाराला आर्थिक अस्थिरतेच्या खाईत ढकलायचे, ही व्यवस्था नेमकी कोणासाठी आहे? असा प्रश्न निर्माण झाला आहे.

बियाणे महाग, खते महाग, औषधे महाग, मजुरी महाग, मशागत महाग आणि सिंचनाचा खर्चही वाढता. एवढा खर्च करून पीक उभे केले की निसर्गाचा फटका तयारच असतो. अतिवृष्टी झाली तरी संकट, पाऊस थांबला तरी संकट, अवकाळी आला तरी संकट आणि गारपीट झाली तरी संकट! निसर्गाने पीक वाचवले तर बाजारभाव शेतकऱ्याच्या विरोधात उभा ठाकतो. म्हणजे शेतकऱ्याने काहीही केले तरी संकट त्याची पाठ सोडत नाही. ही केवळ शेतीची समस्या नाही; ही ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या मुळावर आलेली कुऱ्हाड आहे. या परिस्थितीचा सर्वात मोठा परिणाम ग्रामीण तरुणाईवर होत आहे. बापाच्या शेतात कष्ट करूनही भविष्य सुरक्षित दिसत नसल्याने तरुण शहराकडे धाव घेत आहेत. शेतातील काळी माती सोडून रोजगाराच्या शोधात शहरातील गर्दीत मिसळणे ही आज अनेक शेतकरी कुटुंबांची अपरिहार्यता बनली आहे. शेतीत भविष्य नाही, अशी भावना तरुणांच्या मनात निर्माण होणे हा कोणत्याही सरकारसाठी गंभीर इशारा आहे. शेतकरी संकटाची भीषणता आकडेही सांगत आहेत. जानेवारी ते जून २०२६ या सहा महिन्यांत मराठवाड्यात ४६५ शेतकरी आत्महत्यांची नोंद झाली आहे. छत्रपती संभाजीनगरमध्ये १०९, बीडमध्ये ९५, धाराशिवमध्ये ६५ आणि नांदेडमध्ये ६१ प्रकरणे नोंदली गेली. यापैकी २१५ प्रकरणे मदतीसाठी पात्र ठरली, २६ अपात्र ठरली, तर तब्बल २२२ प्रकरणांची छाननी सुरू होती. १०८ प्रकरणांत मदत देण्यात आली. राज्यातील याच कालावधीतील १,२१६ शेतकरी आत्महत्यांचा आकडा तर आणखी अस्वस्थ करणारा आहे. हे केवळ आकडे नाहीत. प्रत्येक आकड्यामागे उद्ध्वस्त झालेले कुटुंब आहे, मुलांच्या डोक्यावरून गेलेली वडिलांची सावली आहे आणि एका संसाराचा तुटलेला कणा आहे. सरकारकडून योजना नाहीत असे नाही. फळबाग, रेशीम शेती, पशुपालन, दुग्ध व्यवसाय, शेततळे, विहीर, शेळी-मेंढीपालन, ठिबक-तुषार सिंचन आणि शेती यंत्रसामग्रीसाठी असंख्य योजना आहेत. मात्र प्रश्न योजनांचा नाही; प्रश्न त्यांच्या अंमलबजावणीचा आहे. योजना जाहीर होतात, अर्ज मागवले जातात, कागदपत्रांचे गठ्ठे तयार होतात आणि शेतकरी कार्यालयांच्या दारात हेलपाटे मारत राहतो. अनुदान वेळेवर मिळत नाही. प्रकल्प रखडतो. घेतलेले कर्ज मात्र थांबत नाही. मग सरकारी योजना शेतकऱ्याच्या अडचणी कमी करतात की त्याच्या अडचणींची नवी कागदपत्रे तयार करतात, याचा विचार करण्याची वेळ आली आहे. शेतकऱ्याला मदत देताना त्याच्या हातात कागदांचा गठ्ठा देण्यापेक्षा आधाराची खात्री देणे गरजेचे आहे. पीकविमा असो, नुकसानभरपाई असो, अनुदान असो किंवा कर्जसवलतप्रत्येक गोष्ट वेळेत आणि पारदर्शक पद्धतीने शेतकऱ्यापर्यंत पोहोचली पाहिजे. शेतकरी कार्यालयात येण्याची वाट पाहण्याऐवजी प्रशासनाने शेताच्या बांधावर पोहोचले पाहिजे. शेतकऱ्याच्या पिकाचा भाव ठरवताना त्याच्या उत्पादन खर्चाचा विचार झाला पाहिजे. हवामानाच्या लहरींमुळे नुकसान झाले तर मदत कागदावर नव्हे, प्रत्यक्ष खात्यात पोहोचली पाहिजे. सरकारी योजना केवळ जाहिरातींच्या फलकांवर दिसण्याऐवजी त्यांचा लाभ शेतकऱ्याच्या शेतात दिसला पाहिजे. शेतकरी वाचला तर शेती वाचेल आणि शेती वाचली तर देशाची अन्नसुरक्षा टिकेल. त्यामुळे शेतकऱ्यांच्या संकटाकडे केवळ सहानुभूतीच्या नजरेने पाहून उपयोग नाही. निर्णय हवेत, त्यांची अंमलबजावणी हवी आणि ती वेळेत हवी. अन्यथा उत्तम शेती ही म्हण फक्त जुन्या पुस्तकांच्या पानांवर उरेल आणि शेतकऱ्याच्या शेतात उरेल ते फक्त कर्जाचे ओझे आणि अनिश्चित भविष्य!

## आरक्षणाच्या उपवर्गीकरणाविरोधात ५ ऑक्टोबर रोजी महामोर्चा

धर्माबाद/प्रतिनिधी- अनुसूचित जातींच्या आरक्षणाला धक्का लावण्याचा प्रयत्न करणाऱ्यांना धडा शिकवण्यासाठी व आरक्षणाच्या उपवर्गीकरणाच्या विरोधात दि.५ ऑक्टोबर रोजी धर्माबादमध्ये ऐतिहासिक महामोर्चा काढण्याचा निर्णय एका बैठकीत घेण्यात आला.

धर्माबाद शहरात रविवारी, दि.२० सप्टेंबर रोजी महत्वपूर्ण बैठक संपन्न झाली. या बैठकीला धर्माबाद तालुक्यातील मोठ्या प्रमाणात बौद्ध समाज बांधव उपस्थित होते. अनुसुचित जातीतील आरक्षणाच्या उपवर्गीकरणास या बैठकीत तीव्र विरोध करण्यात आला. दि.५ ऑक्टोबर रोजी सकाळी ११ वाजता फुलेनगर येथील महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसरापासून या महामोर्चाची सुरुवात होणार आहे. हा केवळ मोर्चा नसेल, तर आमच्या संविधानिक हक्कांवर गदा आणणाऱ्यांविरोधातील महाआक्रोश असेल, असा इशारा आयोजकांनी दिला आहे. या महामोर्चाच्या समारोप सभेला राज्यातील प्रमुख वक्ते उपस्थित राहणार आहेत.

## गणेशोत्सव शांततेत साजरा करा;नियमभंग करणाऱ्यांवर कठोर कारवाई होणार-गौरव कायंदे पाटील

उमरखेड/प्रतिनिधी-आगामी गणेशोत्सव आणि सर्व सण शांतता, शिस्त आणि सामाजिक सलोखा अबाधित राखून साजरे करावेत. कायदा व सुव्यवस्थेला बाधा पोहोचवणाऱ्या तसेच धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा सहाय्यक पोलीस अधीक्षक तथा उपविभागीय पोलीस अधिकारी गौरव कायंदे पाटील यांनी दिला.

उमरखेड येथील उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालयात आयोजित पत्रकार परिषदेत ते बोलत होते.पोलीस प्रशासनाने शहरातील शांतता, कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी केलेल्या उपाययोजनांची माहिती यावेळी त्यांनी दिली. गणेश आगमनाचा सोहळा पारंपरिक ढोल-ताशांच्या गजरात अत्यंत शिस्तबद्ध आणि उत्साही वातावरणात शांततेत पार पडल्याबद्दल त्यांनी सर्व गणेश मंडळांचे आणि नागरिकांचे आभार मानले. नागरिकांनी सामाजिक सलोख्याचे आदर्श उदाहरण घालून दिल्याचेही त्यांनी नमूद केले.पुढे बोलताना त्यांनी सांगितले की, आगामी गणेश विसर्जन मिरवणूक आणि इतर सणांच्या काळातही मंडळांनी व नागरिकांनी पोलीस आणि प्रशासनाला सहकार्य करावे. मिरवणुकीत डीजे आणि बँजोच्या वापराला फाटा देऊन पारंपरिक वाद्यांचा वापर करावा.जिल्हा पोलीस अधीक्षक आणि उपविभागीय दंडाधिकारी यांनी भारतीय नागरिक सुरक्षा संहिता कलम अन्वये लागू केलेल्या आदेशाचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती आणि संबंधित गणेश मंडळांवर थेट गुन्हे दाखल केले जातील, असा कडक इशाराही त्यांनी दिला.दरम्यान, दहीहंडी उत्सवादरम्यान एका वक्तव्याप्रकरणी उमरखेड पोलीस ठाण्यात यापूर्वीच गुन्हा दाखल झाला असून, कोणत्याही धर्म, जात किंवा समुदायाविरुद्ध द्वेष निर्माण होईल असे वक्तव्य अथवा कृत्य करणाऱ्यांची गय केली जाणार नाही, असेही त्यांनी स्पष्ट केले.या पत्रकार परिषदेला उमरखेड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक शंकर पांचाळ, सहाय्यक पोलीस उपनिरीक्षक अमोल गुंडे व पोलीस कर्मचारी उपस्थित होते.

## डीआयजीच्या पथकाची फत्तेबुरुज भागात कारवाई;४३ लाखांचा गुटखा जप्त

नांदेड/प्रतिनिधी-जुन्या नांदेड शहरातील फत्तेबुरुज येथे रविवारी सायंकाळी विशेष पोलीस उपमहानिरीक्षक कार्यालयातील एका पथकाने धाड टाकुन ४३ लाख रुपयांचा गुटखा जप्त केला आहे. या प्रकरणी तीन जणांविरुध्द इतवारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

इतवारा पोलीस स्टेशनच्या हद्दीत अनेक गुटखा माफिया सक्रीय आहेत. त्यामुळे जुन्या नांदेड शहरात गुटख्याची सर्रासपणे विक्री केली जाते. फत्तेबुरुज भागातील एका घरामध्ये गुटख्याचा अवैध साठा असल्याची माहिती विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांना मिळाली. त्यांच्या आदेशावरुन कार्यालयातील पोलीस पथकाने रविवारी सायंकाळी फत्तेबुरुज येथे धाड टाकली. शासनाने प्रतिबंधीत केलेल्या विविध कंपनीचा ४३ लाख ३२ हजार रुपयांचा गुटखा पोलीसांना आढळून आला. सदरील गुटखा जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात अकबर चाऊस, खय्युम खान व अथर या तीन जणांविरुध्द विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



## सहा.कृषी अधिकाऱ्यांकडून कृषी कार्यालयाकडे सिमकार्ड जमा

कंधार/प्रतिनिधी-महाराष्ट्र कृषी विभागाच्या प्रस्तावित अतांत्रिक आकृतीबंधाविरोधात महाराष्ट्र राज्य कृषीसेवा महासंघाच्या वतीने विविध टप्प्यांत आंदोलन सुरू असून सोमवारी, दि.२१ सप्टेंबर रोजी कंधार तालुक्यातील सहाय्यक कृषी अधिकाऱ्यांकडून शासकीय सिमकार्ड संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांकडे जमा करण्यात आली आहेत.

प्रस्तावित अतांत्रिक आकृतीबंधा विरोधात कृषी अधिकारी-कर्मचाऱ्यांनी १६ सप्टेंबरपासून सर्व शासकीय सभा व ऑनलाईन कामकाजावर पूर्ण बहिष्कार टाकला आहे. त्यानंतर १७ सप्टेंबरपासून सेवा संकल्प अभियानावर बहिष्कार नोंदवण्यात आला आहे. तर सोमवारी, दि.२१ सप्टेंबर रोजी शासकीय सिमकार्ड संबंधित नियंत्रण अधिकाऱ्यांकडे जमा करण्यात आली आहेत.यावेळी २३ सप्टेंबर रोजी तालुका कार्यालयांमध्ये लाक्षणिक धरणे आंदोलन केले जाणार आहे. २५ सप्टेंबर रोजी क्षेत्रीय स्तरावरील अतिरिक्त पदभार सोडून दिले जातील. २८ सप्टेंबर रोजी सर्व अधिकारी व कर्मचारी एक दिवसाची रजा घेऊन जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी कार्यालयासमोर धरणे आंदोलन करतील. ३० सप्टेंबरपासून गुण नियंत्रण नमुने घेण्याचे काम पूर्णपणे बंद केले जाईल. ५ ऑक्टोबर रोजी सर्व विभागीय कृषी सहसंचालक कार्यालयांसमोर धरणे आंदोलन आयोजित करण्यात येईल. ७ ऑक्टोबरपासून राज्यव्यापी बेमुदत कामबंद आंदोलन सुरू करण्यात येणार आहे.

## महानुभाव पंथीय स्थळ परिसरात प्रतिबंधात्मक आदेश

नांदेड/प्रतिनिधी-नांदेड ग्रामीण पोलीस ठाणे हद्दीतील मौजे ब्रह्मपुरी शेत सर्व्हे नं. ४४/१ व ४४/२ जवळील गोदावरी नदीच्या पात्रातील खडक असलेल्या ठिकाणी पूजा-अर्चा करण्याच्या कारणावरून महानुभाव पंथीय व मुस्लिम समाजामध्ये वाद निर्माण होण्याची शक्यता लक्षात घेता, भारतीय नागरिक सुरक्षा संहिता-२०२३ चे कलम १६३ अन्वये सदर परिसर प्रतिबंधित क्षेत्र म्हणून घोषित करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक, नांदेड यांनी दिलेल्या आदेशानुसार दि. २३ सप्टेंबर २०२६ रोजी सकाळी ६ वाजेपासून दि. २२ ऑक्टोबर २०२६ रोजी रात्री १२ वाजेपर्यंत हा प्रतिबंधात्मक आदेश लागू राहणार आहे. या आदेशानुसार प्रतिबंधित क्षेत्राची चतुःसीमा पुढीलप्रमाणे आहे.पूर्वेस वाजेगाव कोल्हापुरी बंधारा, पश्चिमेस नांदेड ते देगलूरकडे जाणाऱ्या रस्त्यावरील जुना पूल, दक्षिणेस गोदावरी नदीचे पात्र आणि उत्तरेस चिल्ला, दर्ग्याची संरक्षण भिंत. महानुभाव पंथाच्या विविध धार्मिक कार्यक्रमांनिमित्त तसेच आगामी सण-उत्सवांच्या काळात या परिसरात भाविकांची मोठ्या संख्येने ये-जा होण्याची शक्यता आहे. या पार्श्वभूमीवर हिंदू, मुस्लिम तसेच महानुभाव पंथीय नागरिकांकडून संबंधित ठिकाणी दर्शन, भेट किंवा धार्मिक कारणासाठी गर्दी झाल्यास कायदा व सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता असल्याने हा प्रतिबंधात्मक आदेश जारी करण्यात आला आहे.


### जाहीर प्रगटन

नांदेड येथील ४ थे सह दिवाणी न्या.क.स्तर नांदेड
यांच्या न्यायालयात
समक्ष एम.आर.कायस्थ सह.दि.न्यायालय क.स्तर
किरकोळ अर्ज क्र.१३७२/२०२६

१. राउबाई भ्र.जळबा देवकांबळे वय ६१ वर्ष धंदा घरकाम, २. गणेश पि.जळबा देवकांबळे वय ३२ वर्ष धंदा मजुरी, ३. साहेबराव पि. जळबा देवकांबळे वय ४१ वर्ष धंदा मजुरी, ४. ज्योती भ्र.साईनाथ गायकांबळे वय ३९ वर्ष धंदा घरकाम सर्व रा.संभाजी चौक सिडको नांदेड ता.जि.नांदेड वय ६९ वर्ष धंदा शेती

विरुध्द

निल

दावा : बॉम्बे रेगुलेशन ॲक्ट १८२७ च्या कलम ३ व ४ प्रमाणे वारसा प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदाराने या न्यायालयात वारसा प्रमाणपत्र अर्ज केला आहे. ज्याअर्थी अर्जदार मयत जळबा पि.मल्हारी देवकांबळे यांचे वारस आहेत. मयत जळबा पि.मल्हारी देवकांबळे यांचा मृत्यू दिनांक ०८/०८/२०२६ रोजी झाला.

अर्जदार हेच मयताचे कायदेशीर वारस आहेत. अर्जदाराशिवाय कोणीही मयताचे वारस नाहीत. अर्जदार यांनी मान्यवर न्यायालयात वारसा प्रमाणपत्र मिळण्यासाठी अर्ज केला आहे. तरी प्रस्तुत प्रकरणी अर्जदार यांच्या नावे वारसा प्रमाणपत्र देण्यास कोणास काही आक्षेप असल्यास त्यांनी तो स्वतः न्यायालयात २६/१०/२०२६ रोजी किंवा तत्पुर्वी नोंदवावा. मुदतीनंतर येणाऱ्या आक्षेपाचा विचार करण्यात येणार नाही व अर्जाची पुढील सुनावणी करण्यात येईल.

आज दिनांक २१/०९/२०२६ रोजी माझ्या सहीनिशी व या न्यायालयाच्या शिक्यानिशी दिले.

स्वाक्षरित/-
**क.लिपीक**
४ थे सह दिवाणी न्यायालय,
क.स्तर,नांदेड

आदेशावरुन
स्वाक्षरित/-
**स.अधिक्षक**
दिवाणी न्यायालय व.स्तर,नांदेड


## वानोळ्यात महिला व युवकांचा दारु विक्री विरोधात एल्गार

माहूर/प्रतिनिधी-गावातील शांतता भंग करणाऱ्या आणि युवा पिढीला व्यसनाच्या विळख्यात ओढणाऱ्या अवैध दारू विक्री विरोधात माहूर तालुक्यातील वानोळा गावातील महिला व युवकांनी एकजूट दाखवत दारूबंदीचा एल्गार पुकारला आहे. गावातील अवैध दारूविक्री कायमस्वरूपी बंद करण्याच्या निर्धाराने रविवारी हनुमान मंदिराच्या प्रांगणात ग्रामस्थांची बैठक पार पडली.

सरपंच सुनीता सिडाम, उपसरपंच अभिजित राठोड आणि गावातील प्रतिष्ठित नागरिकांच्या पुढाकाराने आयोजित या बैठकीला महिला, युवक तसेच ज्येष्ठ नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. अवैध दारूविक्रीमुळे गावातील वातावरणावर परिणाम होत असून, युवा पिढीला व्यसनाचा धोका निर्माण होत असल्याची चिंता उपस्थितांनी व्यक्त केली. केवळ चर्चा न करता अवैध दारूविक्रीला आळा घालण्यासाठी सामूहिक प्रयत्न करण्याचा निर्धार यावेळी करण्यात आला. महिलांनीही दारूबंदीच्या मोहिमेत सक्रिय सहभाग घेण्याची भूमिका घेतली असून, गावातील विविध अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी ग्रामस्थ प्रशासनाला सहकार्य करतील, असे बैठकीत स्पष्ट करण्यात आले. बैठकीस माजी सरपंच माधव शेळके, पोलिस पाटील शेषेराव पवार, मारोती सिडाम, किशोर पवार, नुरसिंग पवार, राजुसिंग राठोड, सुदाम चव्हाण, अनिल तोडसाम, अविनाश राठोड यांच्यासह ग्रामस्थ उपस्थित होते. तसेच युवकांमध्ये मिलिंद तोडसाम, अभिषेक चव्हाण, प्रमोद ठाकरे, गजानन पवार, संतोष पांडे, विठ्ठल सोनटक्के आणि ओमकार राठोड यांच्यासह महिला व पुरुषांची मोठी उपस्थिती होती. वानोळ्यातील महिला आणि युवकांनी घेतलेला हा पुढाकार व्यसनमुक्त व सुरक्षित गावाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल मानले जात असून, दारूबंदीचा निर्धार प्रत्यक्ष कृतीत कितपत उतरतो आणि प्रशासनाकडून कोणती कार्यवाही केली जाते, याकडे ग्रामस्थांचे लक्ष लागले आहे.

## नरसी येथे विघ्नहर्ता गणेश मंडळाच्या वतीने मोफत आरोग्य शिबिर

नायगाव/प्रतिनिधी-श्री विघ्नहर्ता गणेश मंडळ, बालाजीनगर नरसी यांच्या वतीने प्राथमिक आरोग्य केंद्र मांजरम उपकेंद्र नरसी यांच्या संयुक्त विद्यमाने मोफत आरोग्य शिबिराचे आयोजन करण्यात आले.शिबिराचे उद्घाटन नरसीचे माजी सरपंच गजानन भिलवंडे यांच्या हस्ते करण्यात आले.



यावेळी प्राथमिक आरोग्य केंद्राच्या डॉ. जयश्री राठोड, नरसी उपकेंद्राच्या आरोगे सेविका सुलोचना तेलंगे, पी.ए. ससाणे, आरोग्य सेवक साईनाथ काळे, अनिल सोनकांबळे, गंगासागर नारे, अश्विनी सूर्यवंशी, हनमा कडबे, सोफियाताई शेख, सोमित्राताई राजेंलवाड, जोतीताई गोणारे यांनी आरोग्य शिबिरासाठी सहकार्य केले. यावेळी पत्रकार गणेश कंदुरके, पत्रकार हणमंत चंदनकर, मंडळाचे अध्यक्ष शिवराज पा. बामणीकर, उपाध्यक्ष बालाजी पेंटे, संतोष सावकार जुकलकर, योगेश चौधरी, योगेश गंभीरे, शाम चोंडे, गणेश टोम्पे, उत्तम पा. बोधने, बालाजी पा. सोरटे, अंबादास कोकणे, चंद्रकांत इबितदार, मदन पाटील, संभाजी इभुते, राजू वसमते, सुभाष पा. मुंके, बसवंत पाटील मुंके इतर पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

## देगावमध्ये जुगार खेळणाऱ्या चार जणांना अटक

देगलूर/प्रतिनिधी-देगाव येथील हनुमान मंदिरासमोर मोकळ्या जागेत गोलाकार बसून तिरट नावाचा जुगार खेळणाऱ्या चार जणांना देगलूर पोलीसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून २२ हजार रुपयांचा ऐवज पोलीसांनी जप्त केला.

देगाव पुनर्वसन येथील हनुमान मंदिरासमोरील मोकळ्या जागेत दि.२० सप्टेंबर रोजी पहाटेच्या सुमारास काहीजण तिरट जुगार खेळत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली, त्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत छापा टाकला. यावेळी तानाजी धडके (३०), हणमंत डोंगळे, (३१), राजेश जाधव (२८), आणि चंद्रकांत शिंदे (३३) रा. देगाव पुनर्वसन हे संगीत तिरट नावाचा जुगार खेळताना आढळून आले. पोलिसांनी चौघांना ताब्यात घेत त्यांच्याकडील रोख रक्कम, दोन मोबाईल व जुगाराची साहित्य जप्त केले. याप्रकरणी गणेश बोदे मवाड यांच्या फिर्यादीवरून देगलूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# विशाखा राऊत प्रकरणात सर्वोच्च न्यायालयाचा दिलासा;नगरसेवकाची जागा तूर्तास भरु नये

नवी दिल्ली:शिवसेनेच्या ज्येष्ठ नगरसेविका आणि मुंबईच्या माजी महापौर विशाखा राऊत यांच्या ओबीसी जात प्रमाणपत्राच्या वैधतेवरून निर्माण झालेल्या वादावर सर्वोच्च न्यायालयात मंगळवारी सुनावणी झाली. न्यायमूर्ती विक्रम नाथ आणि न्यायमूर्ती संदीप मेहता यांच्या खंडपीठाने संबंधित प्रकरणात नोटीस बजावली असून, राऊत यांच्या नगरसेवकपदाची जागा सध्या भरू नये, असे निर्देश दिले आहेत.

विशाखा राऊत यांनी मुंबई महापालिका निवडणुकीत ओबीसी महिलांसाठी राखीव असलेल्या प्रभाग क्रमांक १९१ मधून निवडणूक लढवून विजय मिळविला होता. त्यासाठी त्यांनी सादर केलेल्या कुणबी जात प्रमाणपत्राच्या वैधतेचा प्रश्न उपस्थित झाला होता. पालघर जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने २० ऑगस्ट २०२६ रोजी त्यांचे जात प्रमाणपत्र अवैध ठरविले. त्यानंतर मुंबई महापालिका आयुक्तांनी २५ ऑगस्ट रोजी संबंधित कायदेशीर तरतुदींनुसार त्यांचे नगरसेवकपद रद्द झाल्याचे कळविले.या निर्णयाविरोधात राऊत यांनी मुंबई उच्च न्यायालयात धाव घेतली होती. मात्र, उच्च न्यायालयाने त्यांची याचिका फेटाळून लावल्याने त्यांनी सर्वोच्च न्यायालयात दाद मागितली. सर्वोच्च न्यायालयातील सुनावणीदरम्यान वरिष्ठ वकील इंदिरा जयसिंग यांनी उच्च न्यायालयाच्या निर्णयाला तसेच निवडणूक याचिकेवरील पुढील कार्यवाहीला स्थगिती देण्याची मागणी केली. दरम्यान, जात प्रमाणपत्र पडताळणी समितीने राऊत यांचे प्रमाणपत्र रद्द करताना संबंधित प्रमाणपत्र जारी करणाऱ्या पालघरच्या उपविभागीय अधिकाऱ्याला ते प्रमाणपत्र देण्याचा अधिकार नव्हता, तसेच सादर केलेल्या कागदपत्रांच्या आधारे कुणबी जात दाव्याची वैधता सिद्ध झाली नसल्याचे नमूद केले होते.

# किनवटच्या कापसाला आदिलाबादची दारे खुली!

## महाराष्ट्र-तेलंगणा प्रशासनाची २९ रोजी महत्त्वाची समन्वय बैठक

किनवट/प्रतिनिधी-आगामी कापूस पणन हंगाम मध्ये कापूस किमान आधारभूत किंमत (एमएसपी) आधारे कापूस खरेदी प्रक्रियेच्या पूर्वतयारी आणि किनवट व माहूर तालुक्यातील कापूस खरेदीच्या पार्श्वभूमीवर २९ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता तेलंगणा राज्याच्या आदिलाबाद जिल्ह्याचे जिल्हाधिकारी राजर्षी शहा यांच्या आदेशावरून जिल्हा मार्केटिंग अधिकाऱ्यांनी अत्यंत महत्वाचा आढावा घेण्यासाठी संबंधित विभाग प्रमुखांसह किनवट व माहूरचे उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, कृषी अधिकारी, शेतकरी प्रतिनिधी अशा प्रमुखांशी चर्चा आणि समन्वयासाठी महाव्यापक बैठक बोलावली आहे.

आदिलाबाद जिल्हाधिकारी कार्यालयाच्या कॉन्फरन्स हॉलमध्ये आढावा बैठक होणार असून किनवटचे आ.भीमराव केराम यांना निमंत्रित करण्यात आले आहे. किनवट व माहूर तालुक्यातील शेतकऱ्यांचा कापूस आदिलाबाद येथे विक्री करण्याचा मार्ग जवळपास मोकळा झालाय हे उल्लेखनीय म्हणता येईल. जिल्हाधिकारी आदिलाबाद. अतिरिक्त जिल्हाधिकारी, पोलीस अधीक्षक, जिल्हाधिकारी, नांदेड यांना निमंत्रित केले आहे. आरजेडीएम, आरडीडीएम. वारंगल. डीआरडीओ, डीआरडीए, आदिलाबाद यांना निर्देश देण्यात आले. या बैठकीला आयकेपी व्हीओएच्या दोन प्रतिनिधी उपस्थित राहणार आहेत. आदिलाबाद जिल्ह्यातील एएमसी क्षेत्रातील सर्व अध्यक्ष, जिनिंग मिल मालक, शेतकरी प्रतिनिधी, तोलमाप करणाऱ्यांचे प्रतिनिधी तसेच खासदार, आमदार आणि एएमसी अध्यक्ष यांना निमंत्रित केले आहे. माहिती व जनसंपर्क विभाग आदिलाबाद, व्यवस्थापकीय संचालक, मेसर्स वन सॉफ्ट सिस्टिम्स प्रा.लि. हैदराबाद यांना निर्देश देण्यात आले असून त्यांनी 'कॉटन कापूस किसान ॲप'ची वैशिष्ट्ये, स्लॉट बुकिंग आणि कॉटन सॉफ्टवेअर यांबाबत माहिती देण्यासाठी निर्देशित केल्याचे प्राप्त पत्रात नमूद केले आहे. किनवट कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती गजानन मुंडे हे देखील बैठकीला जाणार असल्याचे सांगितले. किनवटच्या कापसाला आदिलाबाद सीसीआयने मज्जाव केला होता. शेतकऱ्यांच्या भावना लक्षात घेऊन आ.केराम यांनी दिल्ली येथील अनुसूचित जनजाती आयोगासमोर किनवटच्या कापूस खरेदीवर लावलेले निर्बंध उठवण्यासाठीचे प्रकरण दाखल केले होते. त्यावर सुनावणी आणि अंतिम निर्णय झाल्यानंतर महाराष्ट्र आणि तेलंगणा प्रशासनातील समन्वयाची बैठक लावण्यात आली. याचे श्रेय आ. केरामांना जाते.

# रोकड न मिळाल्याने चोरट्यांनी दारुच्या बाटल्याही लांबवल्या



हदगाव/प्रतिनिधी-हदगाव शहरात रविवारी चोरट्यांनी मध्यरात्री धुमाकूळ घातला होता. त्या मध्यरात्री शहरातील विविध दुकानांना लक्ष्य करत चोरट्यांनी शटर व कुलूप तोडले होते. विशेष म्हणजे बिअर शॉपी, देशी दारूचे दुकान, मेडिकल तसेच अन्य व्यावसायिक आस्थापनांमध्ये घुसून चोरट्यांनी गल्ल्यातील रोकड शोधली. मात्र अपेक्षित रोकड हाती न लागल्याने काही ठिकाणी चोरट्यांनी चक्क बिअर व दारूच्या बाटल्यांवरच डल्ला मारल्याची माहिती समोर आली आहे.

चोरीच्या घटनांमध्ये चोरट्यांचा उद्देश प्रामुख्याने रोख रक्कम व मौल्यवान वस्तू लंपास करण्याचा असतो. मात्र यावेळी काही दारूच्या दुकानांमध्ये गल्ल्यात अपेक्षित रोकड न मिळाल्याने चोरट्यांनी बिअर व दारूच्या बाटल्याही घेऊन पोबारा केल्याची माहिती आहे. त्यामुळे या घटनेने चोरट्यांच्या कार्यपद्धती बाबतही प्रश्न उपस्थित झाले आहेत.काही महिन्यांपूर्वीही शहरातील तामसा रोडवर शटर फोडण्याचा प्रकार दरम्यान, काही महिन्यांपूर्वी तामसा रोडवरील एका भुसार दुकानाचे शटर फोडण्याचा प्रयत्न करताना एक चोरटा सीसीटीव्ही कॅमेऱ्यात कैद झाला होता. त्यावेळी संबंधित घटनेचे सीसीटीव्ही फुटेजसह वृत्त वर्तमानपत्रातून प्रसिद्ध झाले होते. मिळालेल्या माहितीनुसार, त्या घटनेतील संशयिताची ओळख पोलिसांनी पटवली होती. मात्र त्यानंतर त्या प्रकरणात नेमकी काय कारवाई झाली, संशयिताला अटक झाली का आणि पुढे तपासाचे काय झाले, याबाबतची स्पष्ट माहिती अद्याप पोलीसा कडून समोर आलेली नाही शहरातील विविध ठिकाणी घडलेल्या चोरीच्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी परिसरातील सीसीटीव्ही फुटेज तपासणे महत्त्वाचे ठरणार आहे. रविवारच्या मध्यरात्रीच्या घटनेतील चोरट्यांचा माग काढण्यासाठी दुकानांच्या तसेच मुख्य रस्त्यांवरील कॅमेऱ्यांच्या फुटेजची तपासणी करण्यात येत आहे का, याकडे व्यापारी व नागरिकांचे लक्ष लागले आहे.

# बँक कर्मचाऱ्यांचा २८ ते ३० सप्टेंबरला देशव्यापी संप

मुंबई/प्रतिनिधी-पाच दिवसांचा बँकिंग आठवडा लागू करण्यासह विविध मागण्यांसाठी युनायटेड फोरम ऑफ बँक युनियन्सच्या (यूएफबीयू) वतीने २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान देशव्यापी तीन दिवसांचा संप पुकारण्यात आला आहे. या संपाच्या पार्श्वभूमीवर देशभरातील बँक व्यवहार सलग पाच दिवस विस्कळीत होण्याची भिती व्यक्त केली जात आहे.

बँक कर्मचाऱ्यांनी यापूर्वी याच महिन्यात एका दिवसाचा देशव्यापी लाक्षणीय संप पुकारला होता. परंतु केंद्र सरकारने बँक कर्मचाऱ्यांच्या मागण्यांकडे दुर्लक्ष केल्याने आता २८ ते ३० सप्टेंबरदरम्यान होणार असून, त्याआधी सप्टेंबरला दुसरा शनिवार आणि २७ सप्टेंबरला रविवार असल्याने शाखांमधील प्रत्यक्ष बँकिंग सेवा सलग पाच दिवस प्रभावित होण्याची शक्यता आहे. विशेषतः ३० सप्टेंबर हा बँकांचा अर्धवार्षिक आर्थिक ताळेबंदाचा दिवस असल्याने या संपाच्या कालावधीला विशेष महत्त्व आहे. या पार्श्वभूमीवर ग्राहकांनी महत्त्वाची बँकिंग कामे संपापूर्वी पूर्ण करून घेण्याचे आवाहन काही बँकांनी केले आहे. बँक कर्मचारी संघटनांची प्रमुख मागणी म्हणजे आठवड्यात केवळ पाच दिवस बँकांचे कामकाज सुरू ठेवणे. याशिवाय वेतन व भत्ते, निवृत्तिवेतन, कर्मचारी कल्याण आणि इतर सेवा-संबंधित प्रलंबित प्रश्नांवर तोडगा काढण्याची मागणी संघटनांकडून करण्यात आली आहे.

# शेतकऱ्यांच्या मागण्यांसाठी २३ रोजी सारखणीत किसान सभेचे आंदोलन

माहूर/प्रतिनिधी-माहूर व किनवट तालुक्यासह संपूर्ण मराठवाड्यात पावसाचा मोठा खंड पडल्याने शेतकऱ्यांसमोर भीषण दुष्काळाचे संकट उभे ठाकले आहे. सोयाबीन, कापूस, ज्वारीसह विविध पिके पावसाअभावी करपून गेली असून, जनावरांच्या चाऱ्यासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्नही गंभीर बनला आहे. शासनाने दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांच्या समस्यांकडे तातडीने लक्ष देऊन मदत करावी, या मागणीसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या वतीने बुधवार, दि. २३ सप्टेंबर रोजी सकाळी ११ वाजता सारखणी येथे किनवट-माहूर मुख्य रस्त्यावर भव्य रास्ता रोको आंदोलन करण्यात येणार आहे.

माहूर - किनवट तालुक्यांसह संपूर्ण मराठवाडा तात्काळ दुष्काळग्रस्त जाहीर करावा, कोरडवाहू शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपये, तर बागायती पिकांसाठी हेक्टरी एक लाख ५० हजार रुपये नुकसान भरपाई द्यावी, अशी मागणी किसान सभेने केली आहे. यासोबतच शेतकऱ्यांची संपूर्ण कर्जमाफी करून पीकविम्याची रक्कम तातडीने जमा करावी, अशी मागणीही करण्यात आली आहे. दुष्काळाच्या पार्श्वभूमीवर गावोगावी चारा छावण्या सुरू कराव्यात, टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा आणि रोजगार हमी योजनेची कामे तातडीने सुरू करावीत, अशी मागणी आंदोलनाच्या माध्यमातून करण्यात येणार आहे. शेतकऱ्यांचे वीज बिल माफ करून वीज कनेक्शन तोडू नये, विद्यार्थ्यांची शैक्षणिक फी माफ करावी, तसेच कर्जमाफीच्या नावाखाली अद्याप वाटप न झालेले पीक कर्ज तातडीने वितरित करावे, यासह विविध मागण्या किसान सभेने मांडल्या आहेत.या रास्ता रोको आंदोलनात हजारो शेतकरी व शेतमजूर सहभागी होणार असल्याचा दावा आयोजकांनी केला आहे. किसान सभेचे राज्य उपाध्यक्ष कॉम्रेड अर्जुन आडे, राज्य सहसचिव कॉम्रेड शंकर सिडाम, जिल्हा सचिव कॉम्रेड किशोर पवार, तालुका अध्यक्ष कॉम्रेड शंकर गंधमवार, तालुका सचिव कॉम्रेड संजय मानकर, ज्येष्ठ नेते कॉम्रेड डॉ. बाबा डाखोरे, युवक नेते कॉम्रेड अमोल आडे यांच्यासह इतर नेते आंदोलनाचे नेतृत्व करणार आहेत.

# कुस्ती स्पर्धेत अक्षरा निलपवारचे दमदार यश

कुंडलवाडी/प्रतिनिधी-श्री नरागल्ली गणेश मंडळाचे सदस्य शंकर निलपवार यांची कन्या कु. अक्षरा शंकर निलपवार हिने तालुकास्तरीय कुस्ती स्पर्धेत उल्लेखनीय कामगिरी करत विजेतेपद पटकावले. या यशामुळे तिची जिल्हास्तरीय कुस्ती स्पर्धेसाठी निवड झाली असून, तिच्या या कामगिरीचे सर्वत्र कौतुक होत आहे.



अक्षरा निलपवार हिने मिळवलेल्या या अभिमानास्पद यशाबद्दल श्री नरागल्ली गणेश मंडळाच्या वतीने सोमवार, दि.२१ सप्टेंबर २०२६ रोजी नरागल्ली, कुंडलवाडी येथील व्यंकटेश्वर मंदिरात विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी कु. अक्षरा निलपवार हिच्या हस्ते श्री गणरायाची आरती करण्यात आली.आरतीनंतर मंडळाच्या वतीने अक्षरा निलपवार हिचा शाल, श्रीफळ, वृक्ष आणि श्री गणरायाची प्रतिमा भेट देऊन सत्कार करण्यात आला. सुभाष दरबस्तेवार यांच्या हस्ते हा सत्कार करण्यात आला. यावेळी उपस्थित मान्यवरांनी अक्षराच्या कुस्ती क्षेत्रातील पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा देत जिल्हास्तरीय स्पर्धेतही उल्लेखनीय कामगिरी करावी, अशी अपेक्षा व्यक्त केली.या कार्यक्रमास नगरसेवक तथा गटनेते रमेश इरलावार, व्यंकट गट्टुवार, जगन बिरमोड, शंकर कोंडावार, शंकर निलपवार, कोनेरवार, गटूवार, पोरडवार यांच्यासह श्री नरागल्ली गणेश मंडळाचे सर्व सदस्य उपस्थित होते. अक्षरा निलपवार हिच्या यशामुळे कुंडलवाडी परिसरातील क्रीडाप्रेमींमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

# राष्ट्रवादी काँग्रेसच्या जिल्हा संघटकपदी धनलाल पवार



मांडवी/प्रतिनिधी-राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी (शरदचंद्र पवार) पक्षातील उल्लेखनीय योगदान आणि संघटन कौशल्य लक्षात घेऊन मांडवी चे माजी उपसरपंच, श्री. धनलाल दुधराम पवार यांची नांदेड जिल्हा संघटक पदावर निवड करण्यात आली आहे.

याबाबतचे अधिकृत नियुक्तीपत्र पक्षाचे नांदेड जिल्हाध्यक्ष (ग्रामीण) भगवानराव आलेगावकर यांनी जारी केले आहे. या पत्रात नमूद केल्याप्रमाणे, पक्षाची संघटनात्मक बांधणी अधिक मजबूत करण्यासाठी आणि पक्षवाढीसाठी धनलाल पवार सर्व शक्तीनिशी योगदान देतील, असा विश्वास व्यक्त करण्यात आला आहे. तसेच पक्षाचे ध्येय-धोरण आणि राष्ट्रीय अध्यक्ष खा. शरदचंद्रजी पवार साहेब व प्रदेशाध्यक्ष शशिकांतजी शिंदे यांचे विचार तळागाळातील लोकांपर्यंत पोहोचवण्यासाठी ते प्रयत्नशील राहतील, अशी अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. धनलाल पवार यांच्या या निवडीबद्दल पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि परिसरातील नागरिकांकडून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# तलाठी सौ.दिपाली हिमगिरे यांची मंडळाधिकारीपदी पदोन्नती



धर्माबाद/प्रतिनिधी-शासनाचा उत्कृष्ट तलाठी पुरस्कार प्राप्त सौ. दिपाली हिमगिरे (अष्टुरे) यांना सेवा ज्येष्ठतेनुसार 'मंडळाधिकारी' पदावर पदोन्नती देण्यात आली आहे. त्यांनी विभागाची परीक्षा उत्तीर्ण होऊन हे यश संपादन केले आहे.

सौ. दिपाली हिमगिरे यांनी महसूल विभागात काम करताना नेहमीच लोकाभिमुख आणि कर्तव्यदक्ष अधिकारी म्हणून आपली ओळख निर्माण केली आहे. शासकीय योजना सर्वसामान्यांपर्यंत पोहोचवण्यात त्यांनी मोलाचे योगदान दिले आहे. त्यांच्या याच उल्लेखनीय कामाची दखल घेत शासनाने त्यांना यापूर्वी 'उत्कृष्ट तलाठी' पुरस्काराने गौरविले आहे. पदोन्नतीनंतर त्यांच्याकडे आता धर्माबाद तालुक्यातील करखेली मंडळाचा कार्यभार सोपवण्यात आला आहे. त्यांच्या या यशाबद्दल महसूल विभागातील वरिष्ठ अधिकारी, कर्मचारी, लोकप्रतिनिधी आणि करखेली परिसरातील नागरिकांनी त्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

पान १ वरुन

### मराठवाडा पदवीधरसह...

विभागातून सतीश चव्हाण हे विद्यमान सदस्य आहेत.यापूर्वीच्या निवडणुकीतील पक्षीय कामगिरीच्या पार्श्वभूमीवर आगामी निवडणुकीत कोणत्या पक्षाकडून कोणाला उमेदवारी मिळते, याकडे राजकीय वर्तुळाचे लक्ष लागले आहे. उमेदवारांची अधिकृत घोषणा झाल्यानंतर या पाचही मतदारसंघांतील राजकीय चित्र अधिक स्पष्ट होणार आहे. निवडणूक कार्यक्रम पुढीलप्रमाणे निवडणूक अधिसूचना २९ सप्टेंबर तर उमेदवारी अर्जाची अंतिम तारीख ६ ऑक्टोबर, अर्जांची छाननी ७ ऑक्टोबर उमेदवारी अर्ज मागे घेण्याची अंतिम तारीख ९ ऑक्टोबर, मतदान २३ ऑक्टोबर, मतमोजणी २७ ऑक्टोबर रोजी होणार आहे. या निवडणुकीकडे सर्वांचे लक्ष लागून आहे.

### आदिवासी निधी घोटाळ्यातील...

खात्यांचे पुनर्लेखापरीक्षण करून गैरव्यवहारातील रक्कम व्याजासह वसूल करावी, तसेच दोषींवर दखलपात्र कारवाई करावी, अशी मागणी संतोष मरसकोल्हे, बालाजी सिडाम, गोविंद पेंदोर, देवेंद्र कोवे, आशिष उर्वते, बालाजी मंडावी, रामेश्वर पराते, अनिल कनाके, फुलाजी मडावी, किशोर आत्राम व संतोष कनाके यांनी केली आहे.

### संभाव्य दुष्काळी परिस्थितीवर...

दुष्काळसदृश परिस्थितीवर मात करण्यास मदत होणार आहे. त्यामुळे नागरिकांनी पुढाकार घेऊन आपल्या गावातील व शेतजमिनीवरील आवश्यक जलतारा, सिमेंट नाला बांध, विहीर पुनर्भरण, बोअरवेल/बोअर पुनर्भरण तसेच इतर जलसंधारणाच्या कामांचे प्रस्ताव तातडीने संबंधित ग्रामपंचायतीकडे सादर करावेत, असे आवाहन जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी केले आहे.पाणी अडवा-पाणी जिरवा, भूजल वाढवा-पाणीटंचाई टाळा या उद्देशाने ग्रामस्थ, शेतकरी व ग्रामपंचायतींनी जलसंधारणाच्या कामांमध्ये व्यापक सहभाग नोंदवावा, असेही जिल्हा प्रशासनाने कळविले आहे.

# अनुसूचित जमाती विकासाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याच्या मागणीसाठी गुरुवारी धरणे

नांदेड/प्रतिनिधी-महाराष्ट्र अनुसूचित जमाती विकासाची श्वेतपत्रिका जाहीर करण्याच्या मागणीसाठी गुरूवार, दि. २४ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता महात्मा फुले पुतळा आयटीआय ते जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड येथे रॅली काढण्यात येणार असून नंतर शांततामय बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

महाराष्ट्रातील अनुसूचित जमातींच्या विकासासाठी शासनाने केलेली आर्थिक तरतूद, प्रत्यक्ष खर्च, योजना, लाभार्थी व प्रत्यक्ष लाभ याची अधिकृत माहिती जनतेसमोर यावी. तसेच शिक्षण, शिष्यवृत्ती, वसतिगृह, आश्रमशाळा, रोजगार, जात प्रमाणपत्र, जात वैधता प्रक्रिया आणि न्यायालयीन निकाल याबाबत पारदर्शक अधिकृत माहिती उपलब्ध व्हावी. जनगणनेपासून प्रत्यक्ष लाभापर्यंतची अधिकृत आकडेवारी जनतेसमोर आणावी. अनुसूचित जमातींसाठीची तरतूद व प्रत्यक्ष खर्चाची माहिती जाहीर करावी आदी मागण्यांसाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे.रॅली व धरणे आंदोलनात नांदेड जिल्ह्यातील अनुसूचित जमातीच्या विद्यार्थी, युवक, महिला, कर्मचारी, शेतकरी आणि ज्येष्ठ नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन आदिवासी कोळी महादेव समाज मराठवाडा विभागाचे अध्यक्ष नागनाथराव घिसेवाड, व्यंकट मुदिराज, शशिकांत भुसेवाड, ॲड. परमेश्वर गोणारे आणि आदिवासी कोळी महादेव समाज नांदेड यांनी केले आहे.

पान १ वरुन

### दुष्काळग्रस्तांसाठी कुंभमेळ्याचा...

मागणी केली. कुंभमेळ्यासाठी ५५ ते ६० हजार कोटी रुपये खर्च करण्याची गरज नाही. आवश्यक तेवढाच खर्च करून उर्वरित ३० ते ३५ हजार कोटी रुपये दुष्काळग्रस्त शेतकऱ्यांसाठी वळवावेत.

हे वृत्तपत्र प्रकाशक, मालक व संपादक प्रदिप अनंतराव नागापूरकर यांनी मुद्रक अब्दुल गफुर अब्दुल रझाक यांच्या सिमा प्रिंटींग ॲण्ड लिथो प्रिंटींग प्रेस इतवारा बाजार नांदेड, ता.जि.नांदेड येथे छापून नागापूरकर हाऊस, हाऊस नं.१-१०-६९३, विनायकनगर, नवा मोंढा, ता.जि.नांदेड-२ येथे प्रकाशीत केले.आर. एन. आय. नं. ४७१३५/८८ E-mail: nandedwarta@mail.com, मो.९४२२१७४७७४